


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६३९. वा | बुधवार | दि. २७ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये




# महाभ्रष्टाचारी टेकाळेंवर लवकरच कारवाईचा बडगा?

## प्रशासनात वरिष्ठ पातळीवरून पडद्यामागे हालचालींना वेग...

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या पाठपुराव्याला लवकरच मोठ्या प्रमाणात यश येण्याची शक्यता आहे. पडद्यामागे वरिष्ठ स्तरावरून हालचाली सुरू असून, टेकाळे यांच्यावर लवकरच कठोर कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे. जनतेची विविध कामे करण्यासाठी तसेच जनता व सरकार यांच्यात एक दुवा म्हणून काम करण्यासाठी महसूल विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. महसूल विभागाशिवाय सर्वसामान्यांची अनेक कामे पूर्णच होऊ शकत नाही. खरेतर जनतेच्या सेवेसाठी महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी काम करणे गरजेचे आहे. परंतु मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यासारखे महसूलमध्ये बसलेले अनेक झारीतील शुक्राचार्य हे जनतेला लुबाडणूक करण्याचे काम करीत असतात. या लुबाडणुकीतून हे अधिकारी स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम करीत असतात. तसेच स्वतःच्या अनेक अवैध प्रकारच्या संपत्ती जमा करतात आणि मजा मारतात. ही सर्व भ्रष्ट मंडळी एकीकडे जनतेला लूटतात, तर दुसरीकडे शासनालादेखील चुना लावतात. सध्या बुलढाण्याच्या महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार हा एकटा-दुकटा प्रकार नाही, तर या भ्रष्टाचाराला एक संघटित स्वरूप आलेले आहे. त्यामुळेच भ्रष्टाचार करणाऱ्यांनी कितीही अजीर्ण होईस्तोवर भ्रष्टाचार केला, तर त्यासंदर्भात कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही. टेकाळेंच्या प्रकरणात नेमके हेच झालेले आहे. टेकाळे यांनी आपल्या गेल्या २० ते २५ वर्षांच्या महसूल विभागाच्या कारकिर्दीत भ्रष्टाचाराचे प्रचंड विक्रम प्रस्थापित केले. टेकाळेंनी भ्रष्टाचार करताना कोणतीही लाज-शरम किंवा शूचिता बाळगली नाही. हा अनिर्बंध भ्रष्टाचार करताना टेकाळेंनी अनेकांची लुबाडणूक, अडवणूक केली. कागदपत्रांमध्ये मोठी हेरफेर केली. जमिनीच्या कागदपत्रांमध्ये प्रचंड घोळ केले. जमीन वाटणी घोटाळा, तुकडेबंदी घोटाळा, फेरफार घोटाळा, सात-बारा घोटाळा, असे अनेक प्रकार केले. एकाची जमीन परस्पर दुसऱ्याच्या नावावर करण्याचा प्रतापदेखील टेकाळेंनी केला. दुसरीकडे अनेक जमीन सम्राटांशी साटेलोटे केले. त्यांच्याशी संधान साधून स्वतःच्या नावावर मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केली. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कडे आज टेकाळे व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावावर जवळपास पावणेचारशे सातबारा उतारे उपलब्ध आहेत. या एकूण संपत्तीचे मूल्यमापन केले तर ते कोट्यवधी रुपयांचे आहे. टेकाळे यांच्या ज्ञात स्रोतांपेक्षा ही संपत्ती खूपच अधिक आहे. परंतु हे सर्व होत असताना कोण्याही महसूलच्या अधिकाऱ्याने टेकाळेंवर कारवाई केली नाही. टेकाळेंनी आपल्या अधिकाऱ्यांशी साटेलोटे करून स्वतःची कातडी कारवाईपासून वाचवली. दैनिक जनसंचलन कडे टेकाळेंच्या भ्रष्टाचारासंदर्भात भंडाफोड सुरू केल्यानंतर महसूल विभागात मोठी खळबळ उडाली. टेकाळे यांनी विविध प्रकारे दबाव आणून सातत्याने महसूलच्या अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल केले. प्रसंगी राजकीय नेत्यांशी साटेलोटे करून टेकाळेंनी प्रशासनावर दबाव आणला व स्वतःवरील कारवाई वाचवली. परंतु भ्रष्टाचारा संदर्भात दैनिक जनसंचलन ने सुरवातीपासूनच कणखर भूमिका घेतली असल्या कारणाने टेकाळेंच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड सर्वात आधी दैनिक जनसंचलन ने केला. एव्हढेच नाही तर टेकाळेंसारखी महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी कीड हटवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. गेल्या वर्षभरापासून वेगवेगळ्या पातळ्यांवर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने टेकाळे यांच्यावर कारवाईसाठी प्रयत्न सुरू ठेवले. या प्रयत्नांना आता अखेर यश प्राप्त होऊ लागले आहे. दैनिक जनसंचलन ला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार टेकाळेंवर कारवाईसाठी वरिष्ठ स्तरावरून हालचाली होत आहेत. तसेच या वेळेस टेकाळेंना सहीसलामत सुटण्यासाठी आता कोणताही मार्ग शिल्लक राहणार नाही, अशीही माहिती प्राप्त झाली



आहे. टेकाळेंच्या भ्रष्टाचाराची व्याप्तीच एव्हढी आहे आणि त्यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात पुरावे एव्हढे प्रचंड आहेत की त्यांना आता वाचवणे शक्य नाही. अमरावती महसूल विभागीय कार्यालयातून टेकाळेंची चौकशी व कारवाईचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता टेकाळेंना वाचवण्यासाठी कोणतेही मार्ग शिल्लक नाहीत. पर्यायाने आता टेकाळेंवर कारवाई होणे ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ बनली आहे. त्यात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजचा वाटा सर्वात मोठा आहे आणि हेच दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे सर्वोच्च यश असणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# मनोज जरांगेंच्या सभेत चोरी करणं भोवलं...

**वृत्तसंस्था/ परभणी**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या सभेतहोणाऱ्या गर्दीचा फायदा घेत नागरिकांजवळील मोबाईल, रोख रक्कम चोरणाऱ्या चोरट्यांना परभणी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. सोनपेठ, गंगाखेड येथे केलेल्या कारवाईत पॉकेटमारांना पकडण्यात आले असून अकरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींजवळून रोख रक्कम, मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. सोनपेठ आणि गंगाखेड येथे मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा झाली होती. या सभे दरम्यान स्थानिक गुन्हा शाखेचे पथक गस्त घालत होते. या पथकाला काही पॉकेटमार चोर सभेत आले असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सभेत आलेल्या आंदोलकांसारखी वेशभूषा करत गुप्त पध्दतीने पाळत ठेवली. सभेतून काही पॉकेटमार चोरट्यांना ताब्यात घेतले.रेश दादाराव काळे, गणेश सखाराम काळे, अमर देविदास काळे, विशाल रमेश लोखंडे, शरद मुरलीधर काळे, अर्जुन अंकुश पवार, राजेभाऊ बन्सी पवार, राजु जगन्नाथ जाधव, राहुल रमेश जाधव यांना सोनपेठ येथील समेतून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या जवळून रोख १६ हजार ४५० आणि मोबाईल मिळून ४६ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबधीतांना सोनपेठ पोलिसात



हजर करण्यात आले आहे.तर गंगाखेड येथील सभेत दोन चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या जवळून ५ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पो. नि. वसंत चव्हाण, सपोनि. पांडुरंग भारती, पोउपनि. वाघमारे, पोलिस अंमलदार भदर्गे, परसोडे, सातपुते, दुधाटे, चाटे, गायकवाड, डूबे, चव्हाण, निलपत्रेवार, ढवळे, पौळ, ढगे, घुगे, केंद्रे यांच्या पथकाने केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतमजूर, कामगारांना योजनांचा लाभ मिळावा- संदीप शेळके.

## डोणगावात शेतकरी, शेतमजूर मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद...

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतमजूर, कामगार, भूमिहीन, निराधार, दिव्यांगांसाठी अनेक शासकीय योजना असतात. मात्र त्यांची नीट अंमलबजावणी होत नाही. त्यासाठी थेट कृती करणारे एक कष्टकरी-दिव्यांग-निराधारफ समन्वय केंद्र प्रत्येक तहसील कार्यालयात स्थापन केले पाहिजे, असे प्रतिपादन वन बुलढाणा मिशनचे संकल्पक तथा राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी केले. वन बुलढाणा मिशन आणि महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेच्या संयुक्त विद्यमाने २४ डिसेंबर रोजी दुपारी येथील आठवडी बाजार मैदानावर आयोजित शेतकरी, शेतमजूर मेळाव्यात ते बोलत होते. महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेचे प्रमुख दिलीप गायकवाड, उपप्रदेशाध्यक्ष अशोक मानवतकर, प्रा. अनिल ढगे, गजानन मेटांगळे, विष्णू पाटील, श्रीधर सपकाळ, ओमेश काकडे, शेख मेहबूब, दिनेश अडागळे, विष्णू आखरे, शेख वसीम आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, शासनातर्फे जिल्ह्यासाठी एक विशेष अभियान राबवण्यात यावे. याद्वारे जिल्ह्यातील शेतमजूर, कामगार, भूमिहीन, दिव्यांग आणि निराधार यांचे सर्वे क्षण करून त्यांची नोंदणी केली पाहिजे. या प्रवर्गातील नागरिकांना तहसीलदारांकडून शासकीय ओळखपत्र दिले पाहिजे. त्याचा वापर करून शासकीय योजनांचा लाभ दिला पाहिजे. यावेळी बोलतांना महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटनेचे प्रमुख दिलीप गायकवाड यांनी शेतमजूर आणि कामगारांना रेल्वे, एसटी प्रवासात सवलत दिली पाहिजे. तसेच शेतमजूर आणि कामगारांच्या मुलांना मोफत शिक्षण, मोफत शालेय साहित्य, उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जिल्हा नियोजन निधीतून दिली पाहिजे, अशी आग्रही मागणी केली. इतर मान्यवरांनी सुद्धा विचार मांडले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शेतमजूर, कामगारांसाठी अपघात, मृत्यू विमा योजना शेतमजूर आणि कामगारांसाठी जिल्ह्यात स्वतंत्र अशी अपघात आणि अकाली मृत्यू विमा योजना सुरु केली पाहिजे. यासाठी जिल्ह्यातील खासदार आणि सर्व आमदारांच्या निधीतून रक्कम उभारली जाऊ शकते.शेतमजूर, कामगार, निराधार आणि अपंगासाठी विशेष घरकुल योजना चालू केली पाहिजे. या वर्गातील नागरिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना जिल्ह्यातील खासगी रुग्णालयात सवलतीच्या दरात आरोग्य सेवा दिली पाहिजे, अशी मागणी संदीप शेळके यांनी केली. दिव्यांग, निराधारांसाठी पुनर्वसन केंद्र उभारावे



निराधार आणि दिव्यांग यांच्यासाठी खासगी संस्था, उद्योग जगात आणि कॉर्पोरेट कंपन्या यांच्या सहयोगातून जिल्ह्यात एक सुसज्ज असे मदत आणि पुनर्वसन केंद्र उभारले पाहिजे. यात शिक्षण, आरोग्य, रोजगार यासंदर्भात विविध स्तरावर मदत दिली जाऊ शकते. या प्रवर्गातील जेष्ठ नागरिकांसाठी जिल्ह्यात निवारा केंद्र उभारले पाहिजे. त्यात गरजू वृद्धांना राहण्याची आणि आरोग्य सेवा देण्याची व्यवस्था केली जाऊ शकते, असे संदीप शेळके म्हणाले.

## सुभेदार अनंता गिते यांच्यावर जागदरी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

येथून जवळच असलेल्या जागदरी येथील रहिवासी अनंता दत्तात्रय गिते वय ४७ वर्ष हे हरियाना मधील हिसार येथे सेवा बजावित असतांनाच २४ डिसेंबर रोजी काळाने त्यांच्यावर घाला घातला . त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात जागदरी येथे २६ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी मुलगा कपील आणि मुलगी कोमल यांनी मोठ्या दु:खत अंत:करणाने भडाग्नी दिला . जागदरी येथील सुभेदार अनंता दत्तात्रय गिते १९९६ साली सिकंदराबाद येथे सैन्य दलात भरती झाले होते . घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने वडील दत्तात्रय यांनी दोन मुलांना शिक्षण देऊन एकाला सैन्य दलात तर दुसरा पोलीस विभागात पाठविले . संसाराचा गाडा सुरळीत चालू असतानाच अनंता गिते यांना विर मरण आले . वडील हयात असताना मुलाच्या आकस्मित मृत्यूची बातमी समजताच वडिलांच्या काळजाचे ठोके वाढविणारी ही घटना घडली . सुभेदार अनंता गिते यांची सैनिक दलात २७ वर्ष ४ महिने सेवा झाली . हरियाना मधील हिसार येथे सेवा बजावित असतांनाच त्यांच्यावर काळाने घाला घातला . ते सेवा बजावित असतांनाच त्यांना हृदयविकाराचा धक्का बसला . सुभेदार अनंता दत्तात्रय गिते



यांचे पार्थिव सैनिक दलाच्या वाहनातून छत्रपती संभाजी नगर येथून थेट जागदरी येथे आणण्यात आले . त्यांच्याच शेतात अंतिम दर्शनासाठी पार्थिव ठेवण्यात आले . त्यानंतर खासदार प्रतापराव जाधव , माजीमंत्री तथा आमदार डॉ राजेंद्र शिंगणे , शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत , माजी आमदार डॉ शशिकांत खेडेकर , माजी आमदार तोताराम कायंदे , भाजपा पक्ष प्रवक्ते विनोद वाघ यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले . तर शासनाच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील , तहसीलदार सचिन जैस्वाल , साखरखेर्डा येथील ठाणेदार स्वप्निल नाईक , बिबी , लोणार , किनगाव राजा येथील ठाणेदार यांनीही पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली . देशासाठी प्राणाची बाजी लावून लढणाऱ्या सैनिकांना अखेरची सलामी देण्याची ज्यावेळी वेळ येते त्यावेळी हृदयाला पाझर फुटल्याशिवाय राहात नाही . आज जो हजारोंचा जनसागर शेवटचा निरोप देण्यासाठी उपस्थित झाला. त्यावेळी सर्वांची डोळे पानावली,


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# इसरूळ येथे जानकीदेवी महाविद्यालयाचे रासेयो शिबीराचे उद्घाटन...

## अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा

**जनसंचलन/ चिखली**

भारत शिक्षण मंडळ द्वारा संचालित जानकीदेवी कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दत्तक ग्राम इसरूळ येथे आयोजित ७ दिवसीय विशेष शिबिराचे उदघाटन सोमवार दिनांक २५ डिसेंबर रोजी जानकीदेवी विद्यालयाचे अध्यक्ष श्री शेणफडराव घुबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटक म्हणून इसरूळ चे सरपंच तथा चिखली तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष श्री सतीश पाटील भुतेकर हे तर या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून अंढेरा पोलिस स्टेशन चे ठाणेदार श्री विकास पाटील हे लाभले होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगेबाबा व छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील हे स्वतः चे विद्यार्थी राहिलेले असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अशा शिबिराचे आयोजन केलेलं असते अशी माहिती सांगून आजचा तरूण विद्यार्थी कसा बिघडत चाललेला आहे आणि त्यासाठी विद्यार्थ्यांनी अशा शिबिराच्या माध्यमातून मानसिक शुद्धता करून भविष्याचा वेध घेतला पाहिजे त्यासोबतच मुलींच्या बाबतीत बोलताना मुलींनी आपल्या आई-वडिलाच्या घामाचा विचार करून प्रत्येक पाऊल टाकले पाहिजे समाजात कसे वागणे गरजेचे आहे हे सांगून जानकी देवी विद्यालयाच्या अध्यक्षांच्या कार्याची स्तुती केली. यावेळी त्यानी आपला जीवनपट विद्यार्थ्यांं समोर मांडून आपण कसे रासेयो शीबीरातून घडलो हे समजावून सांगितले, त्या प्रसंगी इसरूळ चे सरपंच श्री सतीश पाटील यांनी गावातील परिसर स्वच्छता करण्यासोबतच लोकांच्या मनातील वाईट विचाराची घाण सुद्धा साफ करण्याची किती गरज आहे हे समजावून सांगून आपल्या गावाविषयी दूरदृष्टीकोण कसा असला पाहिजे यावर सुद्धा त्यांनी आपले मत मांडले, त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक श्री पांडुरंग पाटील भुतेकर यांनी आजच्या विद्यार्थ्यांची पावले चुकीच्या दिशेने कशी पडत आहेत यावर प्रकाश टाकून या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्काराची शिदोरी घेता येईल असे मत व्यक्त केले, अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यालयाचे अध्यक्ष शेणफडरावजी घुबे यांनी आपल्या काळ किती खडतर होता, त्यामधून जीवनाचा प्रवास अतिशय चिकाटीने आणि ध्येय वेडे होऊन यश कसे प्राप्त करता येईल यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी रासेयो शिबिरामधून संस्काररूपी शिदोरी घ्यावी व भविष्याच्या दृष्टिकोनातून एक एक पाऊल पुढे टाकावे व समाजामध्ये आपले व आपल्या



शाळेचे व आई-वडिलांचे नाव रोशन करावे अशा शुभेच्छा विद्यार्थ्यांना दिल्या.

या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणुन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग पाटील भुतेकर .माजी संचालक ओमप्रकाश भुतेकर. ग्रा. पं.सदस्य भिकनराव भुतेकर. तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा काळे. शाळा समिती अध्यक्ष विठ्ठल पाटील भुतेकर. पोलीस पाटील श्री जयपाल वायाळ. जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री बंगाळे सर, शिक्षक श्री खेडेकर सर. सोनवणे सर. व जानकी देवी विद्यालयाचे प्राचार्य श्री हरिदास घुबे सर यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक गजानन मिसाळ यांनी मांडले तर सूत्रसंचालन कु. कोमल वरपे आणि प्राजक्ता गावडे हिने केले तर आभार प्रा.उद्धवराव घुबे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री संतोष मिसाळ श्री दिलीप थुट्टे, श्री डी.व्ही थुट्टे व प्रा, डुकरे प्रा.पूनम घुबे मॅडम यांनी सहकार्य केले याप्रसंगी गावातील अनेक प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते.

# पालिका शाळांना महापुरुषांची नावे द्या!

## जनसेवा प्रतिष्ठानचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शहरात नगरपालिकेच्या चार शाळा आहेत. या शाळांना महापुरुषांची नावे देण्यात यावी, अशी मागणी जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे. मुख्याधिकारी यांना या संदर्भात निवेदन देण्यात आले, शहरातील अनेक शिक्षण संस्थांनी आपल्या शाळांना महापुरुषांची नावे दिली आहेत, ही नावे वगळून अन्य महापुरुषांची नावे पालिका शाळांना दिली जावी. या नावांमुळे विद्यार्थ्यांना महापुरुषांचा इतिहास समजण्यास मदत होईल असे निवेदनात म्हटले आहे. तसेच पालिकेने आपल्या शाळा स्मार्ट, डिजिटल करण्याकडे देखील लक्ष दिले पाहिजे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पालिकेच्या शहरातील शाळांना सर्व सुविधा पुरविण्यात याव्या, स्वतंत्र शौचालय, खेळण्याचे साहित्य, इमारतींचे सुशोभीकरण करावी अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी जनसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर एकनाथ मेहेत्रे, उपाध्यक्ष उमेश रामदास खरात, कैलास मेहेत्रे, विजय भालमोडे, गजानन मेहेत्रे, ऋषिकांत मेहेत्रे, नंदकिशोर चौधरी, शंकर बर्डे उपस्थित होते.

# सरकारने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये - पंजाबराव गायकवाड




**जनसंचलन / बुलढाणा**

वाढलेली प्रचंड महागाई आणि तुलनेने मिळणारे तुटपुंजे मानधन याचा विचार केला तर याचा कुठेच ताळमेळ बसत नाही. गेल्या ४८ वर्षा पासून अंगणवाडी सेविका मदतनीस ह्या आपल्या प्रलंबित असलेल्या किमान वेतन, पेंशन, सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा इत्यादी मागण्यासाठी सातत्याने सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. ४ डिसेंबर २०२३ पासून अंगणवाडी कर्मचारी ह्या आपल्या प्रलंबित मागण्यासाठी बेमुदत संपावर गेलेल्या आहेत. परंतू सरकार या प्रश्नावर अजिबात गंभीर नाही. उलट आंदोलन केले तर वेळोवेळी कामावरून काढून टाकण्याच्या धमक्या अंगणवाडी सेविका मदतनीसांना दिल्या जात आहेत. संप फोडण्याचा आटोकाट प्रयत्न प्रशासनाकडून केल्या जात आहे. आज तीन आठवड्या पेक्षा जास्त दिवस होऊन सुद्धा बेमुदत संप सूरू आहे. १५ डिसेंबर रोजी नागपूर विधानसभेवर कृतिसमितीच्या नेतृत्वात राज्यातील २५ हजार अंगणवाडी सेविका मदतनीसांनी मोर्चा काढला परंतु सरकारने त्यांची दखल घेतली नाही. कुठलीही चर्चा व त्यावर तोडगा न काढता दररोज वेगवेगळ्या धमक्या सेविका मदतनीसांना दिल्या जात आहेत. राज्याच्या आयुक्तांनी अंगणवाडी सेविका मदतनीसांवर कारवाई करण्याच्या संदर्भात जिल्ह्यातील महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आदेश दिले आहेत. याचा निषेध करण्यासाठी बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालय समोर आज २६ डिसेंबर २०२३ रोजी सीटूचे जिल्हा अध्यक्ष कॉ. पंजाबराव गायकवाड यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील शेकडो अंगणवाडी सेविका मदतनिसांनी चटणी भाकर खाऊन सरकारच्या नावाने प्रचंड घोषणाबाजी करून निदर्शने केली. तसेच आयुक्तांनी काढलेल्या पत्राची होळी करून सरकारचा निषेध केला.

जिल्हाधिकारी कार्यालय ते जिल्हा परिषद बुलडाणा असा मोर्चा काढून जिल्हा परिषद समोर प्रचंड घोषणाबाजी करून जिल्हा परिषद परिसर घोषणांनी दणाणून सोडला. सरकाने तातडीने संघटनेसोबत सकारात्मक चर्चा करून मानधन वाढीचा प्रश्न सोडविला नाही तर ३ जानेवारी रोजी राज्यातील २ लाख १० हजार अंगणवाडी सेविका मदतनीस ह्या मुंबई येथे आझाद मैदानावर प्रचंड मोर्चा काढतील असा इशारा सुद्धा यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ. पंजाबराव गायकवाड यांनी सरकारला दिला. आजच्या आंदोलनाचे निवेदन जिल्हाधिकारी बुलडाणा तसेच उपमुख्यकार्यकारी अधिकारी महिला व बालविकास प्रमोद एंडोले यांना देण्यात आले. यावेळी पंजाबराव गायकवाड, सचिव प्रतिभाताई पाटील, सरला मिश्रा, जयश्रीताई क्षिरसागर, निशा घोडे, विजया शेळके, लक्ष्मी गवई , अनिता खडसे, वनमाला वानखडे, पुष्पलता खरात, उज्वला खंडारे, वर्षा शिंगणे, उषा जैवळ, डिवरे, प्रविणा बगाडे, अनिता वायाळ, संगीता मादनकर, सुनंदा मोरे इत्यादीसह शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या.

# शरद पवारांच्या हस्ते सौरभ जपेंना फेलोशिप प्रदान...

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील सौरभ दत्तात्रय जपे यांना नुकतीच मुंबई येथे आयोजित एका भव्य कार्यक्रमात शरद पवार (कृषी) इंस्पायर फेलोशिप २०२३-२४ प्रदान करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री मा. शरद पवार यांच्या हस्ते फेलोशिप प्रदान करण्यात आली. यावेळी खासदार सुप्रिया ताई सुळे, डॉ. अनिल काकोडकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सौरभ हे सी.एस.एम.एस कृषी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून पदवी आणि वेलींगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई मधून पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहेत. यशवंतराव चव्हाण सेन्टर द्वारे संपूर्ण महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात नवीन शिदोरी उभारणाऱ्या होतकरू तरुणांना कृषीतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी परिचित करून देणे आणि त्यांच्यामधील उद्योजकीय वृत्ती आणि नेतृत्वगुण विकसित करणे हा उद्देश लक्षात घेऊन शरद पवार इंस्पायर फेलोशिप राबवण्यात येते.




या फेलोशिपसाठी सौरभ यांनी अर्ज केला होता. कठोर अर्ज छाननी आणि मुलाखतीच्या प्रक्रियेतून सुमारे २००० विद्यार्थ्यांमधून ७० विद्यार्थी निवडले गेले. यात बुलढाणा जिल्ह्यातून सौरभ यांची निवड झाली. सौरभ यांचा संशोधन विषय आर्टिफिशियल इंटेलिजन्स (.) प्रणालीचा उपयोग करून शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ मिळवून देणे हा आहे. .. च्या मदतीने योग्य बियाणे, खत आणि सिंचनाचा वापर करून उत्पादन वाढवून शेतकऱ्यांना चांगल्या बाजारपेठेत योग्य भाव मिळवून देण्याचा सौरभ यांचा प्रयत्न आहे. या संशोधनामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. सौरभ यांच्या या यशामुळे बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कृषी क्षेत्रातील मान्यवर, कव्हळा गावातील रहिवासी तसेच समाजबांधवांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सौरभ यांच्यासारख्या अनेक तरुणांच्या यशामुळे भविष्यातील महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात निश्चितच मोठे बदल घडून येतील.

# मोदींच्या विधानाने भाजप नेत्यांची धाकधूक वाढली कुणाची तिकीटे कापणार?

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

राजकारण करणे म्हणजे फक्त तिकीटे मिळवून आमदार-खासदार-मंत्री बनणे, हा भ्रम आपल्या पक्षाला लवकरात लवकर तोडावाच लागेल.... खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच दिलेल्या या इशाऱ्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपच्या तिकीटवाटपात फार मोठे व धक्कादायक म्हणता येतील असे फेरबदल दिसण्याची स्पष्ट चिन्हे आहे.पक्षाचा अगदीच नाईलाज असेल तेव्हाच व त्याच खासदारांना तिसऱ्यांदा तिकीट मिळू शकेल, एक कुटुंब -एकच तिकीट या सूत्राचे कटाक्षाने पालन केले जाईल, अनेक केंद्रीय मंत्री व खासदारांना पक्षसंघटनेकडे वळविले जाईल आणि पिढी परिवर्तनाची उत्तम संधी म्हणजे २०२४ ची लढाई, या काही ठळक सूत्रांनुसार काही अपवादांसह भाजपचे तिकीटवाटप होण्याचा रागरंग आहे. लोकसभेच्या तारखा जाहीर होण्याआधीच किमान १५० उमेदवारांची नावे निश्चित करण्याचेही भाजपने ठरविले आहे.पंतप्रधान मोदी- गृहमंत्री अमित शहा यांनी नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या मिनी लोकसभा निवडणुकीत अनेक धाडसी प्रयोग केले व तीन राज्यांत ते यशस्वीही झाले. मध्य प्रदेशात तब्बल ६१ टक्के व छत्तीसगडमध्ये ५५ टक्के मंत्री हे प्रथमच आमदार झाले आहेत. आता मात्र दोन वेळा लोकसभेवर आलेल्या भाजप खासदारांची पुन्हा तिकीट मिळण्याची वाट अत्यंत बिकट होणार आहे. नवीन नेतृत्व तयार करण्यासाठी अनेक पक्षनेत्यांना संघटनात्मक कामाकडे वळविले जाईल, राज्याराज्यातील पक्षनेत्यांना दिल्लीत आणले जाईल अशी चिन्हे आहेत. महाराष्ट्रासारख्या ज्या राज्यांत महाविकास आघाडीचा जोर दिसत आहे, त्या राज्यांबाबत मोदी-शहा वरील सारे नियम काटकोरपणे लावण्याची शक्यता आहे. जुन्या चेहऱ्यांना हटविण्याची किंवा २०२४ च्या निवडणुकीनंतर त्यांना मंत्रिपदे न देण्याची मोहीम भाजप केंद्रातील काही दिग्गज मंत्र्यांपासूनच सुरू करेल अशीही दिल्लीत चर्चा आहे.केंद्रीय पक्षसंघटनेतून राज्यांत जाऊन लोकसभेवर येऊ शकतात त्यात विनोद तावडे, पंकजा मुंडे, राधामोहन अग्रवाल आदींची नावे चर्चेत आहेत. ज्यांना राज्यातून दिल्लीत आणले जाऊ शकते त्यात उत्तर प्रदेशातील श्रीकांत शर्मा यांच्यासारखे मंत्री व राजनाथसिंह यांचे चिरंजीव पंकज, पश्चिम बंगालमधून सुकांत मुजूमदार तसेच महाराष्ट्रातील काही ज्येष्ठ मंत्र्यांच्या नावांचीही चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडीला खीळ बसण्याची चिन्हे दिसताच, ममता बॅनर्जींचा हा बालेकिल्ला खिळखिळा करण्यासाठी भाजपने नवी निवडणूक व्यवस्थापन समिती जाहीर केली आहे. गृहमंत्री अमित शहा आता बंगाल व तेलंगण-



केरळकडे विशेष व व्यक्तिशः लक्ष देणार आहेत. बंगाल व्यवस्थापन समितीमध्ये शहांसह पक्षाध्यक्ष जेपी नड्डा, भाजप प्रदेशाध्यक्ष सुकांत मजुमदार, सुवेंदू अधिकारी आदी १५ सदस्य आहेत. भाजपने २०२४ मध्ये पश्चिम बंगालमधून ३५ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. विधानसभा निवडणुकीत कोरोनाची साथ असतानाही भाजपने बंगालमध्ये आपली संपूर्ण ताकद लावली होती. ममता बॅनर्जींचे उजवे हात असलेले सुवेंदू अधिकारी यांच्या साथीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शहा यांनी संपूर्ण टीमसह राज्यात जणू तळ ठोकला होता. या हायप्रोफाईल निवडणुकीत भाजपच्या जागा फार वाढल्या नसल्या तरी मतांच्या टक्केवारीत तब्बल २८ टक्क्यांनी वाढ झाली होती.

# देवेंद्र फडणवीसांच्या लेटरबॉम्बनंतरही नवाब मलिक आणि अजित पवारांची भेट

## राजकीय चर्चाला आले उधान...



वृत्तसंस्था /मुंबई

राष्ट्रवादीचे आमदार नवाब मलिक यांनी मंगळवारी रात्री राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांची देवगिरी या निवासस्थानी भेट घेतली. मलिक हे सुमारे तासभर देवगिरीवर होते. देवगिरीवर राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक सुरू असताना मलिक तिथे दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. हिवाळी अधिवेशनात मलिक सत्ताधारी बाकांवर बसल्यानंतर पवारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्हे निर्माण झाले होते त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पवार यांना पत्र लिहून याबाबत नाराजी व्यक्त केली होती. जोपर्यंत मलिकांवरील आरोप खोटे असल्याचे सिद्ध होत नाहीत तोपर्यंत त्यांना महायुतीमध्ये सहभागी करून न घेण्याची विनंतीही या पत्राच्या माध्यमातून त्यांनी केली होती. त्यानंतर मलिक आणि पवार यांची भूमिका काय असणार, याकडे सर्वांचेच लक्ष होते. मंगळवारी सायंकाळी राष्ट्रवादीच्या नेत्यांची अजित पवार यांचे शासकीय निवासस्थान देवगिरीवर बैठक सुरू होती. या बैठकीत मलिक दाखल झाले, मलिक साधारण तासभर या बैठकीत सहभागी झाले, यावेळी त्यांची कन्या सना मलिकही सोबत होती. मलिक बैठकीतून निघून गेल्यानंतर प्रफुल्ल पटेल देवगिरीवर दाखल झाले. या भेटीबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी मलिक यांना विचारले असता त्यांनी यावर बोलण्यास नकार दिला. मलिक यांच्या या भेटीमुळे मात्र, ते अजित पवार यांच्या गटात सामील होणार का, याविषयी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे

# बुलढाणा जिल्ह्यात एसीबीच्या सहा महिन्यात १२ कारवाई...

## उपअधीक्षक शीतल घोगरे यांची धडाकेबाज कामगिरी...




जनसंचलन / बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात एसीबीच्या सहा महिन्यात १२ कारवाई, उप अधीक्षक शीतल घोगरे यांची धडाकेबाज कामगिरी. शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना गडगंज पगार असताना देखील अजूनही लाचखोरी कमी झालेली नाही, हे बुलढाणा जिल्ह्यात एसीबीच्या होत असलेल्या कारवाई वरून निदर्शनात येत आहे.. गेल्या सहा महिन्यापूर्वी एसीबीच्या उप अधीक्षक पदी शीतल घोगरे ह्या रुजू झाल्यापासून एसीबी कारवाई चा आलेख वाढला आहे.. आलेल्या तक्रारी वरून शीतल घोगरे यांनी सहा महिन्यात १२ ट्रॅप केले आहेत, ज्यामध्ये एकूण १५ लाचखोर अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. ज्यामध्ये वर्ग एक चा एक तर वर्ग दोन च्या दोन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तर शीतल घोगरे ह्या रुजू होण्यापूर्वी जानेवारी ते जून अश्या सहा महिन्यात आठ कारवाई झाल्या आहेत.तर कुठल्याही शासकीय कार्यालयात काम करून देण्यासाठी पैशाची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्याचे आवाहन उप अधीक्षक शीतल घोगरे यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत



## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...

**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

8x8 cm
1 Month=5000/-
15 Day=3500/-
7 Day=2000/-
Hight 8 cm
Width 8 cm

5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 8 cm

5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 23 cm

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

2600/-
Hight 12 cm
Width 12 cm

1800/-
Hight 8 cm
Width 10 cm

1300/-
Hight 8 cm
Width 8 cm

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही निःशुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com